हवामान आधारीत कृषि सल्ला
ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

६१) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.०३.११.२०२६ जिल्हा: नाशिक

मागील आठवड्यातील हवामान (२८/१०/२०२६ ते ०३/११/२०२६)							हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०४/११/२०२६ ते ०८/११/२०२६)				
२८	२९	३०	३१	०१	०२	०३	दिनांक	०४	०५	०६	०७	०८
०.०	०.०	०.०	०.०	०.४	०.०	०.०	पाऊस (मिमी)	४	०	०	०	०
३१.२	३०.५	३१.४	३०.५	३१.१	३०.८	२८.७	कमाल तापमान (अं.से.)	३३	३५	३५	३४	३४
२३.२	२३.२	२०.४	२३.०	२३.८	२४.०	२२.२	किमान तापमान (अं.से.)	२२	२०	२०	१८	१६
अं:ढगाळ	अं:ढगाळ	अं:ढगाळ	ढगाळ	अं:ढगाळ	ढगाळ	निरभ्र	ढग स्थिती (आकाश)	अं:ढगाळ	अं:ढगाळ	ढगाळ	अं:ढगाळ	अं:ढगाळ
६८	६९	८०	७८	७२	७५	६६	सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	७०	६९	६६	४८	४३
५७	५६	५४	६५	६२	६०	४९	दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	६१	६०	५६	४७	३८
१०.३	१०.७	२.०	४.९	६.३	७.०	७.४	वाऱ्याचा वेग (किमी/तास)	५.२	५.९	८.०	८.०	७.३

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश		पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात दि. ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी तुरळक हलक्या पावसाची शक्यता आहे व उर्वरित दिवस हवामान कोरडे राहील. आकाश पुढील पाच दिवस अंशतः ढगाळ राहिल. कमाल तापमान ३३-३५ डिग्री सें. व किमान तापमान १६-२२ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ५-८ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.
हवामान सतर्कता/इशारा:		इशारा नाही
सामान्य सल्ला		वाटाणा पिकाचे लागवडीचे काम पूर्ण करावे. लसून पिकाचे लागवडीचे काम पूर्ण करावे. फ्लॉवर, कोबी व टमाटे रोपांची काळजी घ्यावी. रब्बी हंगामातील टमाटे पिकाची लागवड शेवटच्या आठवड्यात करावी. खरीप कांदा लागवडीचे पाणी तोडावे. खरीप कांदा पिकाची काढणी करावी. कांदा काढणी करून ३ ते ५ दिवस शेतात सुकवावा. २.५ ते ३.० सें.मी. पात ठेवून कांदा कापणी करावी. रांगडा कांदा लागवडीस नत्र खताचा पहिला हफ्ता द्यावा. रब्बी कांदा रोपवाटिकेची काळजी घ्यावी. पश्चिम घाट विभागात अधिक आर्थिक फायदा मिळविण्यासाठी उपलब्ध ओलाव्यावर उतेरा पीक पद्धतीत भात पिकानंतर जवस पिकाची ७५ टक्के शिफारशीत खत मात्रा (१९:३८:०० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर) देऊन लागवड करण्याची शिफारस करण्यात येत आहे. पाण्याची उपलब्धता असल्यास चाऱ्यासाठी ओट, बरसीम, लसूणघास यांची पेरणी करावी व मर्यादित पाणी असल्यास रब्बी ज्वारी (फुले अनुराधा व फुले सुचित्रा) पिकाची चाऱ्यासाठी पेरणी करावी.
संदेश		**दि. ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी तुरळक हलक्या पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता कापणी/मळणी केलेल्या खरीप पिकांना ताडपत्रीने झाकून ठेवावे किंवा सुरक्षित जागेवर ठेवावे.**
रब्बी ज्वारी	पेरणी	पेरणीचा हंगाम जवळपास संपलेला आहे. तथापि, अपरिहार्य परिस्थितीत नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत पेरणी करता येते. परंतु खोडमाशीचा प्रादुर्भाव वाढतो, त्यासाठी पेरणीपूर्वी थायमेथोक्झाम (३० एफएस) १० मि.लि. प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. काणी रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी गंधक (३०० मेश) ४ ग्रॅम प्रति किलो बियाणे प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर किंवा ॲझोस्पिरिलम २५ ग्रॅम आणि स्फुरद विरघविळणाऱ्या जिवाणू संवर्धकाची प्रत्येकी २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. रब्बी ज्वारी पेरणीसाठी फुले माऊली, फुले अनुराधा, परभणी मोती या वाणांची निवड करावी. एकरी ४ किलोऐवजी ६ किलो बियाणे वापरावे.
गहू	पेरणी	संरक्षित पाणी उपलब्ध असल्यास पेरणी ५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावी. गव्हाची बागायती वेळेवर पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. या कालावधीत पेरणी केल्यास फुटव्यांची संख्या, ओंबीची लांबी, ओंबीतील दाण्यांची संख्या, दाण्याचा आकार आणि वजन वाढून उपेक्षित उत्पादन मिळते. बागायती गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबरनंतर केल्यास प्रत्येक पंधरवड्यास एकरी एक क्विंटलने उत्पादन कमी येते. वेळेवर पेरणीसाठी फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, फुले सात्विक, एम.ए.सी.एस ६२२२, एम.ए.सी.एस ६४७८, डी.बी.डब्लू.१६८ या सुधारित वाणांचा वापर करावा. पेरणीसाठी प्रती हेक्टर १०० किलो बियाण्यांचा वापर करावा. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम (७५% डब्लू. एस.) ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास प्रक्रिया करावी. बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळ विणाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. बियाण्यास गुळाच्या थंड पाण्यात मिसळून चोळावे. असे बीजप्रक्रिया केलेले बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते. तसेच मावा किडीचा नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम ३० एफ.एस. ७.५ मिली प्रति १० किलो बियाणे प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. बागायती वेळेवर गव्हाची पेरणी करतांना दोन ओळीत २० सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी उभी आडवी अशी दोन्ही बाजूने न करता एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करता येते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते.
हरभरा	पेरणी	बागायती हरभरा पिकाची पेरणी १० नोव्हेंबर पर्यंत केल्यास चांगले उत्पादन येते. काबुली हरभऱ्याची पेरणी सिंचनाची सोय असेल तरच करावी. देशी हरभऱ्यामध्ये विजय, विशाल, दिग्विजय, फुले विक्रम आणि फुले विश्वराज हे वाण मर रोग प्रतिकारक्षम असून, जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीस योग्य आहेत आणि काबुली हरभऱ्यामध्ये विराट, पीकेव्ही-२ (काक-२), पीकेव्ही-४ आणि कृपा हे वाण अधिक उत्पादन देणारे आहेत. पेरणीपूर्वी एक किग्रॅ बियाण्यास २ ग्रॅम बाविस्टीन + २ ग्रॅम थायरम आणि २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणू संवर्धन गुळाच्या थंड द्रावणाद्वारे चोळून बीजप्रक्रिया करावी. पेरणीनंतर लगेच पुरेसा ओलावा असताना उगवणीपुर्व तणनाशक पेंडिमेथालिन फवारावे.
भात	लोंबी वाढीची / पीक पक्वतेची अवस्था /कापणी अवस्था	भाताच्या काही जाती पक्व झाल्या तरी हिरव्या दिसतात. म्हणून कापणीस उशीर करू नये. त्यामुळे दाणे खडतात तसेच भरडताना कणी जास्त होते. भात सदृश्य तणाची भेसळ काढणीपुर्वी लगेच काढावी जेणेकरून त्याचे दाणे खडून इतर स्वच्छ भात प्रक्षेत्रावर होणारा प्रसार थांबवता येईल. वेळेवर लागवड केलेल्या भात पीकात काढणीपूर्वी १० दिवस अगोदर पाण्याचा निचरा करावा. पीक निसवल्यावरसाधारणपणे २५ ते ३० दिवसांनी ओंबीतील ८० ते ९०% दाणे पक्व झाल्यावर भाताची कापणी करावी. वैभव विळ्याचा वापर यासाठी करावा. यामुळे खोडकीडीचे नियंत्रण होते.
नाचणी/नागली व वरई	पक्वतेची अवस्था / कापणी अवस्था	उशिरा पेरलेले नाचणी पिक फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत असेल आणि पाण्याची कमतरता भासत असेल तर पाण्याची उपलब्धतेनुसार पिकास संरक्षित पाण्याची व्यवस्था करावी. हवामानाच अंदाज लक्ष्यात घेता पिक पक्व होताच लवकरात लवकर काढणी करावी. पिकांची काढणी कणसे खुडून किंवा जमिनीबरोबर कापणी करावी. कणसे चांगली वाळल्यानंतर कणसे बडवून मळणी करावी. धान्य स्वच्छ करून उन्हात चांगले वाळवून हवेशीर जागी साठवण करावी.
खुरासणी	फुलोरा ते पक्वतेची अवस्था	जर खुरासणी पिक फुलोरा अवस्थेत असेल तर कीटकनाशकाची फवारणी करू नये. खुरासणी पिकाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी, खुरासणी पिकात कीटक परागीभवन घडवण्याकरिता एक मधमाश्यांचे कृत्रिम पोळे प्रति एकरसाठी वापरण्याचे शिफारस करण्यात आली आहे.

हवामान आधारीत कृषि सल्ला
ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ **ईमेल:igatpuri.amfu@gmail.com**

द्राक्ष		द्राक्षबागेवर प्लॅस्टिक आच्छादन राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्रात थॉम्पसन सीडलेस या वाणात तीन वर्षे केलेल्या अभ्यासानुसार त्याचा वापर अनुकूल असल्याचे आढळले आहे. प्लॅस्टिक आच्छादनाचे फायदे फुलगळ, घडकुज व केवडा रोगाच्या प्रादुर्भावावर नियंत्रण केले जाते. हे आच्छादन द्राक्षवेलींचे भाग (ओलांडे, खोड आणि काड्या) यांचे गारांपासून नुकसान होण्यापासून संरक्षण करते. बिगरहंगामी पावसामुळे मणी फुटण्याच्या घटना कमी करते. वेलींच्या वाढीवर तापमानाचा प्रभाव कमी होतो. फळछाटणीच्या हंगामात आच्छादनाखालील पानांमधून बाष्पोत्सर्जन कमी झाल्यामुळे सिंचनासाठी पाण्याची गरज कमी होते. चांगल्या प्रतीचे द्राक्ष उत्पादन मिळते.
डाळिंब		बहार व्यवस्थापन रोप लागवडीनंतर साधारणपणे दोन वर्षांनी पहिला बहार धरावा. त्यापुर्वी बहार धरल्यास झाडे कमकुवत व अशक्त राहून रोगास लवकर बळी पडतात. एका वर्षात एकच बहार धरावा. बहार धरल्यानंतर झाडांच्या आकारमानानुसार नियंत्रित फळे ठेवावीत. त्यामुळे फळांचा आकार वाढून दर्जेदार उत्पादन मिळते.
आंबा		हंगामपूर्व तयारी आंब्याला मोहोर येण्यासाठी झाडाच्या मुळांना ताण बसणे आवश्यक असते. यासाठी बागेतील गवत काढून बागेची साफसफाई लवकरात लवकर पूर्ण करावी. जमिनीमध्ये पाण्याचे प्रमाण बाष्पीभवनामुळे लवकर कमी होऊन झाडांना ताण बसण्यास मदत होईल.
कांदा		रांगडा कांदा रांगडा कांद्याची पुनर्लागवड राहिलेल्या शेतकऱ्यांनी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत लागवड पूर्ण करावी. ज्या शेतकऱ्यांना खरीपात पाण्याअभावी लागवड करता येत नाही आणि विहरीतील पाणी जेमतेम फेब्रुवारी-मार्च पर्यंतच पुरते, त्यामुळे रबी कांदा करता येत नसल्याने रांगडा कांद्याची लागवड करावी. रबी हंगामातील किंवा खरीपातील जातींचे स्वतः घरी अशास्त्रीय पद्धतीने तयार केलेलं बी वापरून रांगडा हंगामात लागवड केली तर डेंगळे वाढण्याची शक्यता जास्त असते.
टोमॅटो		सापळा पिके टोमॅटो पिकात फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव कमी अधिक प्रमाणात वर्षभर आढळतो. या अळीच्या नियंत्रणासाठी पिकाभोवती मक्याच्या ओळी लावल्यास या किडीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. टोमॅटो पिकात झेंडूच्या ओळी लावल्यासही या किडीचा प्रादुर्भाव कमी होतो. फुलांच्या गर्द रंगाकडे आकर्षून मादी झेंडूच्या झाडांवर अंडी घालते. याशिवाय सूत्रकृमींच्या वाढीसदेखील आळा बसतो.
पशुधन (गाय व म्हैस)		पावसापासून पशुधन व कुक्कुट पक्ष्यांचे साठवलेले पशुखाद्य, चारा व कडबा याचे प्लास्टिक/ ताडपत्रीने झाकून संरक्षण करावे. चारा सुरक्षा चाराटंचाईची शक्यता लक्षात घेऊन उपलब्ध हिरवा चारा, कडबा, पिकांचे अवशेष, वाळलेला चारा आणि इतर स्रोतांचे नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन, कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांची लागवड, मुरघास निर्मिती, चाऱ्याची पौष्टिकता वाढविणे आणि सामूहिक चारा व्यवस्थापन या बाबींवर भर देणे गरजेचे आहे. उपलब्ध हिरवा चारा मोठ्या प्रमाणात एकाच वेळी जनावरांना देण्याऐवजी त्याचे नियोजनबद्ध वाटप करावे. सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका, तूर आणि इतर पिकांपासून उपलब्ध होणारे अवशेष चारा म्हणून वापर करावा. या अवशेषांचे योग्य कुट्टीकरण करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक केल्यास पुढील काळातील चाराटंचाई कमी करण्यास मदत होऊ शकते. कडबा व इतर कोरडा चारा पावसापासून सुरक्षित, हवेशीर आणि शक्यतो जमिनीच्या थेट संपर्कापासून दूर ठेवावा. ओलसर किंवा बुरशी आलेला चारा जनावरांना देणे टाळावे. योग्य साठवणूक केल्यास उपलब्ध चाऱ्याची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात टिकवता येते.
शेळी		शेळ्यांची निवड करताना किंवा व्यवसाय सुरू करताना शक्यतो तो हिवाळ्यात सुरू करावा. कारण हिवाळा ऋतू हा आरोग्यासाठी पोषक मानला जातो. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी पावसाळ्यात चारा लागवड करून चारा खाण्यायोग्य झाला की हिवाळ्यात शेळ्यांची खरेदी करावी.
कुक्कुटपालन		कुक्कुटपालन फायदेशीर होण्यासाठी महत्वाच्या बाबी वयोगटानुसार कुक्कुटपालनात तीन प्रकारचे व्यवस्थापन आवश्यक आहे संतुलित खाद्य, रोगप्रतिबंधक उपाय व शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन या तीन सुत्रांमुळे कुक्कुटपालन व्यवसायाची वाढ झालेली आहे. सूत्र १- संतुलित खाद्य वयोगटानुसार कोंबड्यांना द्यावयाचे खाद्य

खाद्याचा प्रकार	वय आठवडे	प्रथिने (%)	स्निग्ध (%)	तंतुमय (%)	कॅल्शियम (%)	फॉस्फरस (%)
चिक मॅश	१ ते ८ दिवस	२२	३.४	३.३	१.२	०.६ ते ०.७
ग्रोअर मॅश	९ ते १६	१६	३.४	५.०	१.२	०.६ ते ०.७
प्रीलेअर मॅश	१७ ते १९	१५	३.४	३.३	१.२	०.६ ते ०.७
फेज-१	१९ ते ३५	१६	३.४	४.५	२.५	०.६ ते ०.७
फेज-२	३५ ते ५५	१८	३.४	४.७	२.७	०.६ ते ०.७
फेज-३	५५ ते ८०	१८	३.४	४.५	२.७	०.६ ते ०.७

स्त्रोत:

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र,मुंबई.

२) मागील हवामान: ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

ठिकाण : विकृसंके,इगतपुरी
दिनांक : ०३.११.२०२६

स्वाक्षरीत/-
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी
तथा सहयोगी संशोधन संचालक,
वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक